Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal (Journal No. 47026)

ISSN 2319 - 359X

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# IDEAL



Volume - X, Issue - I
September - February - 2021-22
Marathi Part - I/ II

Impact Factor / Indexing
2020 - 6.008
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | गुणवत्ता वाढीसाठी अध्ययन व अध्यापन तंत्रातील कौशल्ये<br>**डॉ. सौ. सुनीता सिनगारे** | ५७-६१ |
| १४ | भारतातील कृषी किंमतीतील बदलाची प्रवृत्ती आणि किंमत धोरणाचा अभ्यास<br>**प्रा. डॉ. डी. के. मगर** | ६२-६६ |

VOLUME - X, ISSUE - I - SEPTEMBER - FEBRUARY - 2021-22
IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.008 (www.sjifactor.com)

# १४. भारतातील कृषी किंमतीतील बदलाची प्रवृत्ती आणि किंमत धोरणाचा अभ्यास

**प्रा. डॉ. डी. के. मगर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर.

**प्रस्तावना**

अर्थव्यवस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी कृषी विकास होणे आवश्यक असते. विकासाच्या प्राथमिक अवस्थेत सर्व प्रमुख घटकांमधील बदल हे कृषीमुळेच घडून येतात. कृषी उत्पादनाच्या किंमतीनाच कृषी किंमती म्हणतात. कृषी किंमती ह्या अर्थव्यवस्थेचा महत्वपूर्ण भाग आहेत. इतर व्यवसायाप्रमाणेच कृषी व्यवसायाच्या यशाचा मापदंड हा कृषी व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नावर अवलंबून असतो. शेतकऱ्यांचे उत्पन्न हे कृषी उत्पादनाची उत्पादकता आणि त्यांच्या किंमतीवर असते त्यामुळे एका आदर्श किंमत धोरणाद्वारे उत्पादक, उपभोक्ता, विपणन कार्यकर्ता आणि निर्यातकर्ता इत्यादी वर्गाच्या हिताचे संरक्षण केले जाते. कृषी वस्तु संबंधित किंमत धोरणामुळे शेतकऱ्यांना कृषी व्यवसायात अधिक गुंतवणूकीची प्रेरणा मिळावी व उपभोक्त्यांच्या हिताचेही संरक्षण व्हावे यासाठी कृषी किंमत धोरणाची आवश्यकता असते. शेतमालाच्या किंमती शेतकऱ्यांच्या दृष्टीने किफायतशीर असतील तर शेतकरी हे शेतीमध्ये अधिक गुंतवणूक करतील आर्थिक बाबतीतील प्रत्येक टप्पा किंमतीशी संबंधित असल्यामुळे, कृषी विकासामध्ये कृषी किंमतीची भुमिका महत्त्वाची असते. त्यासाठी भारतातील कृषी किंमतीतील प्रवृत्ती आणि कृषी किंमत धोरणाचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.

**भारतातील कृषी किंमतीतील प्रवृत्ती**

भारतातील कृषी किंमतीच्या प्रवृत्तीतील बदलाचे दोन भागात विभाजन केले जाते.

**1. स्वातंत्र्यपूर्व कालखंड**

भारतात स्वातंत्र्यपूर्व कालखंडात कृषी किंमतीचे विघटन आणि परिवर्तनाची धारणा होती. पहिल्या महायुद्धानंतर भारतात कृषी उत्पादनाच्या किंमतीचा विकास होत गेला. पायाभूत सेवा सुविधांचा विकास झाल्यामुळे कृषी उत्पादनाच्या गतिशिलतेत वाढ घडून आली. इंग्लंड आणि युरोपीय देशामध्ये कापूस, ताग, चहा, तेलबिया आणि मसाल्यांच्या पदार्थांना मागणी वाढल्यामुळे भारताचा युरोपीय बाजारपेठांशी संपर्क वाढला. त्यामुळे कृषी उत्पादनाच्या किंमतीमध्ये वाढ झाली. भारतातील कृषी ही जास्तीत जास्त मोसमी पावसावर आधारित असल्यामुळे कृषिमध्ये मोठ्या प्रमाणावर अनिश्चितता होती. त्यामुळे कृषी उत्पादनात सतत चढउतार होत असत. त्याचा परिणाम कृषी उत्पादनाच्या किंमतीमध्ये सुद्धा चढ-उतार होत असत. सन 1943 मध्ये बंगाल मध्ये दुष्काळ पडल्यामुळे तांदळाच्या किंमती मध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली होती.

**2. स्वातंत्र्योत्तर कालखंड**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात आर्थिक नियोजनाचे धोरण स्वीकारले होते. परंतु कृषी उत्पादनाच्या किंमती स्थिर नव्हत्या त्यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणावर चढउतार झाले. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या सुरूवातीस कृषी उत्पादनाच्या किंमती जास्त होत्या. परंतु या योजनेच्या कालावधीत कृषी उत्पादन वाढल्यामुळे कृषी किंमतीमध्ये 20 टक्के घट झाली. परंतु दुसऱ्या योजनेत उत्पादनातील घटीमुळे कृषी किंमती 27 टक्क्यांनी वाढल्या होत्या. ही प्रवृत्ती तिसऱ्या योजनेमध्ये सुद्धा होती.

**कृषी किंमतीतील चढ-उताराची कारणे**

**1. मानसुन मधील अनिश्चितता**

भारतातील 60 टक्क्यापेक्षा जास्त क्षेत्र हे सिंचनाच्या बाबतीत पावसाच्या पाण्यावर आधारित आहे. त्यामुळे ज्यावर्षी पर्जन्यमान चांगले असेल त्यावर्षी कृषी उत्पादनात वाढ घडून येते त्यामुळे कृषी उत्पादनाच्या किंमती घटतात आणि जेव्हा पर्जन्यमान सरासरीपेक्षा कमी असते तेव्हा कृषी उत्पादनात घट होते त्याचा परिणाम बाजारपेठेत कृषी उत्पादनाचा पुरवठा कमी झ ाल्यामुळे कृषी उत्पादनाच्या किंमती वाढतात.

**2. सरकारचे पतधोरण**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पत धोरणामुळे कृषी किंमती प्रभावित होतात. जेव्हा सरकारचे पत धोरण स्थिर असते तेंव्हा कृषी उत्पादनाच्या किंमती घटतात आणि याउलट सरकार आपल्या पत धोरणाचा विस्तार करते तेंव्हा कृषी उत्पादनाच्या किंमत वाढतीची प्रवृत्ती असते.

**3. कृषी उत्पादनाची तात्काळ विक्री**

भारतामध्ये शेतकऱ्यांजवळ उत्पादनसाठा करण्यासाठी जागेची किंवा गोदामाची व्यवस्था नसल्यामुळे आणि शेतकरी कर्जबाजारी असल्यामुळे आपले उत्पादन तात्काळ विक्री करतात त्यामुळे बाजारात पुरवठा मोठ्या प्रमाणावर वाढतो. त्याचा परिणाम कृषी उत्पादनाच्या किंमती घटतात. पुरवठा कमी झाल्यानंतर त्या पुन्हा वाढतात.

**4. व्यापाऱ्यांची साठा प्रवृत्ती**

व्यापारी कृषी उत्पादनाच्या खरेदीनंतर त्या उत्पादनाचा साठा करून बाजारपेठेत उत्पादनाची कृत्रिम टंचाई निर्माण करतात त्यामुळे बाजारपेठेत मागणी वाढल्यामुळे कृषी उत्पादनांच्या किंमती वाढतात.

**5. सरकारचे दोषपूर्ण व्यापारी धोरण**

सरकार विदेशी चलनाची प्राप्ती करण्यासाठी कृषी उत्पादनाची निर्यात करते त्यामुळे किंमतीमध्ये वाढ होते. याउलट सरकार कृषी उत्पादनाची मोठ्या प्रमाणावर आयात करते अशावेळी देशात कृषी उत्पादनाच्या किंमती घटतात.

**6. दोषपूर्ण वितरण व्यवस्था**

भारतातील कृषी किंमतीमधील अस्थिरतेचे महत्वाचे कारण म्हणजे आवश्यक उपभोग्य वस्तुंचे दोषपूर्ण वितरण व्यवस्था होय. सरकारद्वारे बफर स्टॉक तथा लेवीद्वारे उपभोक्त्यांना वस्तुचे आर्थिक आंशिक वितरण स्वस्तधान्य दुकानाद्वारे केले जाते. त्यामुळे किंमती नियंत्रित करतात येत नाहीत.

**7. मागणी-पुरवठ्यातील असमतोल**

शेतमालाची मागणी आणि पुरवठा यामध्ये समायोजनाचा अभाव दिसून येतो. त्यामुळे या क्षेत्रात आर्थिक चढउतार निर्माण होतात. शेतमालांचा पुरवठा अलवचिक असल्याने मागणीत बदल घडून येतात त्यामुळे मागणी-पुरवठ्यात असमतोल निर्माण होतो किंवा मागणी स्थिर असतांना नैसर्गिक अनुकूलतेमुळे भरपूर उत्पादन झाले तरी असमतोल निर्माण होतो. त्यातून आर्थिक उच्चवचनांना सुरूवात होते. शेतमालाच्या मागणी-पुरवठ्यात पूर्ण समायोजन साध्य होत नसल्यामुळे शेतीमध्ये आर्थिक उच्चवचने निर्माण होतात.

**भारतातील कृषी किंमत धोरण**

देशातील आर्थिक विकासामध्ये कृषी उत्पादनाच्या किंमतीची महत्वपूर्ण भूमिका असते. एका आदर्श किंमत धोरणाद्वारे उत्पादक, उपभोक्ते, पतसंस्था यांच्या हिताचे संरक्षण केले जाते. त्याचबरोबर उत्पादकतेत आवश्यक वाढ केली जाते. किंमती ह्या उत्पादकांना अधिक प्रोत्साहन देणाऱ्या असाव्यात, त्याचबरोबर उपभोक्त्याच्या कृयशक्तीवर प्रतिकूल परिणाम करणाऱ्या नसाव्यात तेव्हाच किंमत धोरणाचा उद्देश सफल होतो.

**कृषी किंमत धोरणाची उद्दिष्टे**

**1. आकर्षक किंमती**

भारतीय शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी त्यांच्या कृषी उत्पादनास आकर्षक किंमती मिळणे आवश्यक असते. कृषी उत्पादनास जास्त किंमती मिळाल्यास त्यांच्या उत्पादनात वाढ होते आणि शेतकऱ्यांना जास्त उत्पन्न मिळाल्यास कृषी मधील कार्यक्षमता वाढते.

**2. शेतकऱ्यांना प्रोत्साहन**

शेतमाल किंमत धोरणामुळे शेतकऱ्यांना कृषी उत्पादनास योग्य किंमत मिळत असल्यामुळे अधिक उत्पादन घेण्यासाठी प्रेरणा मिळते त्यामुळे शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जास्तीत जास्त उत्पादन घेण्यास प्रवृत्त होतात.

**3. भांडवल निर्मितीस प्रोत्साहन**

शेती उत्पादनास योग्य किंमत मिळाल्यास शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होते त्यामुळे बचत व गुंतवणुकीच्या माध्यमातून भांडवल निर्मिती होते.

**4. अनुकूल व्यापार अटी निर्माण करणे**

शेती व बिगर शेती क्षेत्रातील व्यापार अटीमध्ये समन्वय निर्माण करण्यासाठी अनुकूल किंमत धोरण जाहिर करून शेती क्षेत्रासाठी व्यापार अटी अनुकूल करणे.

**5. उत्पन्न विषमतेत घट करणे**

सरकारने निश्चित केलेल्या शेतमालाच्या किंमतीमुळे प्राथमिक व बिगर प्राथमिक क्षेत्रामधील विषमता कमी होत असते.

**6. अस्थैर्यावर नियंत्रण ठेवणे**

शेती उत्पादनाच्या किंमती मधील चढ-उतारावर नियंत्रण ठेवणे[5]

**7. उपभोक्त्याचे सरंक्षण**

उपभोक्त्याचे संरक्षण करण्यासाठी उपभोक्त्याला योग्य किंमतीवर वस्तुचा पुरवठा करणे.

**8. उत्पादन समतोल**

कृषी मध्ये अन्नधान्य पिकाचे उत्पादन आणि व्यापारी पिकांचे उत्पादन यांच्यात योग्य समतोल राखण्यासाठी किंमत धोरणाचे उद्दिष्ट असते.

**9. कच्चा माल पुरवठा**

औद्योगिक क्षेत्राला योग्य किंमतीवर कच्चा माल उपलब्ध करून देण्यासाठी व कच्चा मालाचा सतत पुरवठा करण्यासाठी.

**10. किंमतीमध्ये समानता प्रस्थापित करणे**

उत्पादन आणि उपभोगाच्या दृष्टीकोनातून शेतकऱ्यांद्वारे उत्पादित केल्या जाणाऱ्या वस्तु आणि औद्योगिक वस्तु यांच्यात समानता आणणे.

**11. संसाधनांचा पर्याप्त वापर**

अर्थव्यवस्थेच्या कृमिक विकासाचे उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी मिश्र अर्थव्यव्स्थेत खाजगी व सार्वजनिक क्षेत्राच्या माध्यमातून संसाधनांचे पर्याप्त विभाजन करणे.

**कृषी किंमत धोरणाचे महत्त्व**

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषिप्रधान अर्थव्यवस्था आहे. कृषी क्षेत्र आणि राष्ट्रीय उत्पन्न यांच्यात जवळचे संबंध आहेत. कृषी किंमती केवळ कृषी क्षेत्रावरच नव्हे तर एकूण राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत महत्वाची भुमिका पार पाडीत असतात.

1. उपभोक्त्यांना उच्च राहणीमान स्तर पदान करण्यासाठी उपभोग्य वस्तु उपलब्ध करून देणे.
2. अन्नधान्याचा आवश्यक पुरवठा करणे.
3. उपभोक्ता किंमत आणि उत्पादकांची किंमत यांच्यातील अंतर कमी करण्यासाठी महत्त्व.

4. उपभोग्य वस्तु आणि कच्च्या मालाचा पुरवठा सतत करण्यासाठी शेतकऱ्यांना जास्तीत जास्त उत्पादन घेण्यासाठी प्रोत्साहित करणे.
5. योग्य समायोजनाद्वारे कृषी किंमतीतील चढ-उतार कमी करणे.
6. कृषी किंमतीमध्ये स्थैर्य प्रस्थापित करून भांडवली गुंतवणूक वाढविणे.
7. कृषी उत्पादनाच्या निश्चित पुरवठ्यासाठी कृषी उत्पादनाच्या किंमतीमध्ये अनुकूल बदल करणे.
8. कृषी आणि औद्योगिक उत्पादनाच्या किंमतीमध्ये आवश्यक आणि औचित्यपूर्ण सामंजस्य राखण्यासाठी आणि या दोन्ही क्षेत्राचा विकास व्यापारी तत्त्वावर करण्यासाठी कृषी किंमत धोरणाचे महत्त्व आहे.

**सारांश**

कृषी किंमती सरकारच्या दृष्टीने महत्त्वाच्या असतात त्या सार्वत्रिक आर्थिक नियंत्रण, कृषी विकासातील व्युहरचनेचा घटक नियोजन आणि प्रकल्पाचे सूसूत्रीकरण, मौद्रिक आणि राजकोषीय धोरण यांच्यातील समन्वय आणि बाजारातील माहिती आणि मध्यस्थ इत्यादींच्या धोरणासाठी कृषी किंमती महत्त्वाच्या असतात. कृषी किंमती ह्या शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. शेतकरी कृषी किंमतीद्वारे कृषी व्यवसायाचे दिर्घकालीन नियोजन करतात. शेतीमध्ये दिर्घकालीन गुंतवणूक करण्यासाठी शेतकऱ्यांना किंमतीचे ज्ञान असणे आवश्यक असते. कोणत्या पिकाचे उत्पादन घ्यावे तसेच व्यवस्थापन इत्यादीसाठी कृषी किंमती महत्त्वाच्या आहेत असे सारांश रुपाने सांगता येते.

**संदर्भ**

1. मनोहरचंद्र पांडे (2011); कृषी विपणन, डिस्कवरी पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली.
2. माथुर बी.एल. (2013); कृषी अर्थशास्त्र, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली.
3. कविमंडन विजय (2002), कृषी अर्थशास्त्र, मंगेश प्रकाशन, नागपूर, पृ.क्र.104.
4. पोवळे, टकले, खंदारे (2012), कृषी विकासाचे अर्थशास्त्र, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
5. Batra M. M. (1978); Agriculture Production Prices and Technology, Allied Publication New Delhi.
6. भोसले, काटे, दामाजी (2009); कृषी व्यवसाय, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

Asstt. Prof.
Hut.Jaywantrao Patil Mahavidyalaya
Himayatnagar Tq. Himayatnagar Dist. Nanded